# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
## महाराष्ट्र राज्य , पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे - ४११००१

**मधुकर चौधरी**
भा. प्र. से. (से. नि.)
आयुक्त
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण

कार्यालय : ०२०-२६०५०६४१
भ्रमणध्वनी : ७३५०११११००
ई-मेल : comscea.pune@maharashtra.gov.in


जा.क्र.अ.शा.प.क्र.कक्ष-५/अ ब क व ड/निवडणूक निधी/ /सन२०१५/७३९४
दिनांक :१८/०८/२०१५

विषय :- 'अ' 'ब' 'क' व 'ड' प्रकारच्या संस्थांच्या निवडणूक निधीच्या आणि निवडणूक खर्चाच्या विहीत नोंद वहया ठेवणेबाबत

संदर्भ :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क ब

२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३,१८,७५ ७६ व ७७

३) प्राधिकरणांचे आदेश क्र रासनिप्रा/निवडणूक परिश्रमिक/५८८/२०१४ दि.२९/१०/२०१४.

४) प्राधिकरणांचे आदेश क्र रासनिप्रा/परिश्रमिक भत्ते/७७५/२०१४ दि.१७/११/२०१४.

५) प्राधिकरणांचे आदेश क्र रासनिप्रा/अ-ब वर्ग/नि.निधी/परिश्रमिक भत्ते/१०१५/२०१४ दि.९/१२/१४.

६) प्राधिकरणांचे आदेश क्र रासनिप्रा/अ,ब, क व ड वर्ग/नि.निधी/परि.भत्ते/नोंद वहया/१५३३/१५ दि.४/०२/२०१५.

प्रिय श्री,

कृपया विषयांकित प्रकरणी प्राधिकरणाच्या संदर्भ क्र.३ ४ व ५ आदेशांचे अवलोकन व्हावे.

सदर आदेशांन्वये प्राधिकरणाने निवडणूकीच्या अनुषंगिक खर्चासाठी निवडणूक निधी, परिश्रमिक व भत्ते निश्चित करून सदर खर्चासाठी आवश्यक कार्यपध्दती निहीत केली आहे.संदर्भ क्र.६ आदेशाद्वारे विहीत केलेल्या नमुन्यातील नोंद वहया मध्ये अशा निवडणूक निधीच्या जमा खर्चाच्या नोंदी ठेवणे आवश्यक आहे. प्राधिकरणाने विहीत केलेल्या विविरण पत्रात अंतिम निवडणूक खर्चाच्या नोंदी तपशिल वार देयकांचे मुळ प्रती सह अभिलेखात जतन करून ठेवणेबावत सुचना निर्गमित केल्या होत्या.

तथापी, प्राधिकरणाने केलेल्या प्राथमिक पाहणी मध्ये उपरोक्त निर्देशाचे गांभिर्यपूर्वक अनुपालन झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर पाहणीमध्ये निदर्शनास आलेलया काही बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) प्राधिकरणाचे आदेश क्र.रासनिप्रा/अ,ब क व ड वर्ग/नि.निधी/परि.भत्ते/नोंद वहया/१५३३/२०१५ दि.४/०२/२०१५ अन्वये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ठेवावयाच्या नोंद वहया व त्याची कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर आदेशाद्वारे १ ते ७ सुचना निर्गमित केल्या आहेत. परंतु सदर बाबीचे अनुपालन झालेले नाही.

२) प्राधिकरणाचे आदेश क्र.रासनिप्रा/अ-ब वर्ग/नि.निधी/परिश्रमिक भत्ते/१०१५/२०१४ दि.१/१२/२०१४ सोबत जोडलेल्या विविरण पत्रामध्ये निवडणूकीच्या अंदाजित/अंतिम खर्चाचा तपशिल ठेवावयाचा होता.तथापी सदर आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही.

३) निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जमा खर्चाचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून हिशोब पूर्ण करून घेवून विहीत नमुन्यातील संदर्भ क्र.६ मधील खतावणी क्र.१ व ४ या नोंद वहीत तपशिलवार देयकांसह अंतिम हिशोब जतन करण्यात आलेले नाहीत.

४) निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केलेला जमा खर्च संदर्भ क्र.६ मधील खतावणी क्र.२ व ३ आणि बँकेचे पासबुक यांची खाते जुळवणी पूर्ण करून निवडणूक पूर्ण झाल्यानंतर अशी खाती बंद करण्यांत आलेली नाहीत.

५) निवडणूकीत स्विकारलेल्या उमेदवार अनामतीचे अंतीम जमा खर्च (अनामत जप्त करणे/परत करणे) पूर्ण करण्यांत आलेले नाहीत.

६) निवडणूक खर्चातील अनेक रक्कमा प्रत्यक्षात अदा न करता त्या अदा केल्याचे दर्शवून हिशोब पूर्ण करण्यांत आले आहेत. त्यामुळे बँक पासबुकामधील नोंदी आणि प्रत्यक्ष जमा खर्च यात मोठी तफावत दिसून येते.

उपरोक्त बाबी अत्यंत गंभीर असून जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक निधीच्या जमा खर्चाच्या हिशोबा बाबत वैयक्तिक रितीने लक्ष देवून प्राधिकरणाच्या निर्देशाप्रमाणे हिशोब पूर्ण करून हिशोबाचे अभिलेख व्यवस्थित जतन करणे अभिप्रेत आहे. वरील परिच्छेदामध्ये नमुद केलेलया बाबींची पुनरावृत्ती इतर कार्यालयामध्ये होवू नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेवून दिनांक ३१/०७/२०१५ अखेर पूर्ण झालेल्या सर्व निवडणूकांचे अंतीम हिशोब दिनांक ३१/०८/२०१५ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पुर्ण करून तसा अहवाल प्राधिकरणांस सादर करावा.

आपला,

(मधुकर चौधरी)

प्रती :-

श्री./श्रीमती..................................................

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी